माध्य

आवक क्रमांक 92C093
21 Jun

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.२०४/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०६ मार्च, २०१९

प्रस्तावना -

विदयाशिल्प एज्युकेशन ट्रस्ट, मांजरी, पुणे संचलित विस्तारा वर्ल्ड स्कुल, भेकराई नगर, फुरसुंगी रोड, पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत विदयाशिल्प एज्युकेशन ट्रस्ट, मांजरी, पुणे संचलित विस्तारा वर्ल्ड स्कुल, भेकराई नगर, फुरसुंगी रोड, पुणे या शाळेस (प्राथमिक ते माध्यमिक, इयत्ता १ ली ते १० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने विहीत निकषाची व मुदतीची मुदतठेव पावती, अदययावत रु. २५, ००० /- चे नवीन चलन व संस्थेच्या नावाने एकूण ४० आर. जमिनीबाबतच्या ७/१२ चा अदययावत उतारा / खरेदी खत / नोंदणीकृत बक्षिसपत्र किंवा जमीन भाडेकरार (लिज) असल्यास ३० वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु

झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.**

(४) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, **शाळेचे ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा**:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

०६.०३.२०१९

(रा. वि. कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

2652

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ 73AA 861939

अनु.क्र. 39483 दि. 26/10/23 मु.शु. रक्कम 100/-

दस्ताचा प्रकार Aff.

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय / नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव Vidyashilp Education Trust

पत्ता Bhekrainagar Fursungi pune

दुसऱ्या पक्षकाराचे नांव Pandurang doiphode

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता

सुर्यकांत पुंडलिक गवळी
परवाना क्र. २२०५०७९
मुद्रांक विक्रेत्याची सही लोणीकाळभोर (कदमवाकवस्ती) ता.हवेली, जि.पुणे-४१२२०१

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला, त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी
20 OCT 2023
प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

NOTARY
JAWAHAR PRALHAD SHITOLE
PUNE (MAH.)
REG.NO.11154
Expiry Date 05/04/2025
GOVERNMENT OF INDIA

## प्रतिज्ञापत्र

मी श्रीमती कांचन शशिकांत नासरे मांजरी, ता. हवेली जि. पुणे -४१२३०७ सत्यप्रतिज्ञेवरून कथन करते कि, मी विद्याशिल्प एजुकेशन ट्रस्ट या संस्थेची विस्तारा वर्ल्ड स्कूल ह्या एकमेव शाळेची अध्यक्ष आहे. आमची शाळा गेली ६ वर्षांपासून फुरसुंगी या ठिकाणी कार्यरत आहे.

शाळेचा संपूर्ण पत्ता: भेकराई नगर, फुरसुंगी रोड, पुणे.

आमच्या संस्थेच्या, विस्तारा वर्ल्ड स्कूल या शाळेस सन २०१८-१९ पासून इ. १ ली ते ८ वी पर्यंतच्या वर्गाना परवानगी दिली आहे. सदर शासन निर्णय पत्र क्रमांक: **एस एफ एस १०१९/प्र. क्र. २०४/ एस एम**-२, मधील अट क्रमांक १ मध्ये नमूद केलेली ४० आर जमिनीबाबत ची अट, सदर शाळा महानगर पालिका हद्दीत असल्यामुळे लागू होत नाही. सदर शासन निर्णयाचे दुरुस्ती पत्र करून ते आम्ही सहा महिन्याच्या आत सादर करू. सदर कागदपत्रांची पूर्तता करण्याची मी हमी देते.

सदर प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर खरा व बरोबर असून त्यात काही चूक अगर तफावत आढळून आल्यास मी भारतीय दंडविधान संहिता कलम १९९, २०० व १९३/२ नुसार शिक्षेस पात्र राहीन हे मला मान्य आहे.

सदरचे प्रतिज्ञापत्र आज दिनांक :- ०३/११/२०२३. रोजी लिहून दिले असे.



लिहून देणार

Kanchan

NOTARY
JAWAHAR PRALHAD SHITOLE
PUNE (MAH.)
REG.NO.11154
Expiry Date 05/04/2025
GOVERNMENT OF INDIA

NOTED AND REGISTERED AT SERIAL NUMBER 2652/2023

BEFORE ME

JAWAHAR PRALHAD SHITOLE
NOTARY, GOVT. OF INDIA
PUNE

03 NOV 2023

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

# महाराष्ट्र शासन

**नगरविकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक पीएमसी-३०१४/प्र.क्र.६४/नवि-२२**
**मंत्रालय (मुख्य इमारत) ४ था मजला, मादाम कामा रोड,**
**हुतात्मा राजगुरू चौक,**
**मुंबई -४०० ०३२.**
**दिनांक : ०४.१०.२०१७**

**शासन निर्णय :-** सोबत,

[1] महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलाम (३) च्या खंड (अ) नुसार, शासन अधिसूचना क्रमांक-पीएमसी-३०१४/प्र.क्र.६४/नवि-२२, दिनांक ०४/१०/२०१७ ( मराठी / इंग्रजी )

[२] महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम -पाच) याचे कलम ४ यासह २५४ चे पोटकलम (१) चा खंड (क) नुसार शासन अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक -झेडपीबी -२०१२- प्र.क्र.६६/पुणे(१)/पं.रा ५ दिनांक ०४/१०/२०१७ (मराठी/ इंग्रजी)

[३] महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१(सन १९६२ चा महा. अधिनियम -पाच) याचे कलम ५ यासह २५६ चे पोटकलम (१) चा खंड (ख) नुसार शासन अधिसूचना,ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक -झेडपीबी -२०१२- प्र.क्र.६६/पुणे(२)/पं.रा ५ दिनांक ०४/१०/२०१७ (मराठी/ इंग्रजी)

[४] महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (सन १९५९ चा महा. अधिनियम-तीन) याचे कलम ४ चे पोटकलम (२) चा खंड (ख) नुसार शासन अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक - झेडपीबी - २०१२- प्र.क्र.६६/पुणे(३)/पं.रा ५ दिनांक ०४/१०/२०१७ (मराठी/ इंग्रजी)

[५] महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (सन १९५९ चा महा. अधिनियम-तीन) याचे कलम 4 चे पोटकलम (१) यासह कलम २५४ च्या पोटकलम (१) चा खंड (क) नुसार शासन अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक - झेडपीबी -२०१२-प्र.क्र.६६/पुणे(४)/पं.रा ५ दिनांक ०४/१०/२०१७ (मराठी/ इंग्रजी)

महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(सं.श. गोखले)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई

२) विभागीय आयुक्त,पुणे विभाग, पुणे.

३) जिल्हाधिकारी पुणे,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, पुणे.

५) संचालक, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१.

६) आयुक्त, पुणे महानगरपालिका,पुणे.

७) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई (यांना विनंती करण्यात येते कि, प्रस्तुत अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०४/१०/२०१७ च्या असाधारण राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येऊन त्यांच्या प्रत्येकी ५० प्रती, या विभागास, विभागीय आयुक्त, पुणे, विभाग, जिल्हाधिकारी पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद पुणे, संचालक नगररचना आणि मूल्यनिर्धारण, महाराष्ट्र राज्य व आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना पाठवाव्यात.

८) निवड नस्ती, कार्यसन नवि-२२.

## अधिसूचना

नगर विकास विभाग,
मंत्रालय,
मादाम काम रोड,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ३२
दिनांक :- ४ ऑक्टोबर, २०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई ५९)

क्रमांक – पीएमसी-३०१४/प्र.क्र.६४/नवि-२२.- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा ५९) च्या कलम ३ चे पोट कलम (४) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन राजपत्र, व असाधारण, भाग एक-अ-मध्य उप-विभाग येथे दिनांक २९ मे, २०१४ रोजी प्रसिद्ध केलेल्या शासन अधिसूचना क्रमांक पीएमसी-३०१४/प्र.क्र.६४/नवि-२२, दिनांक २९ मे, २०१४ अन्वये महाराष्ट्र शासनाने पुणे महानगरपालिका क्षेत्राच्या सीमांत फेरफार करण्याच्या दृष्टीने त्यामध्ये काही क्षेत्रे समाविष्ट करण्याचा आपला इरादा जाहीर केला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने त्यामध्ये नमूद कालावधीत प्राप्त सर्व हरकती व सूचनांचा शासनाने विचार केला आहे;

ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुच्छेद २४३ थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेता पुणे महानगरपालिका क्षेत्राच्या सीमांत फेरफार करण्याच्या दृष्टीने त्यामध्ये काही क्षेत्रे समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम(३) च्या खंड(अ) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, पुणे महानगरपालिका यांच्याशी सल्लामसलत करुन व उक्त कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (अ) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धी केल्यानंतर, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांचा समावेश पुणे महानगरपालिका क्षेत्रात करण्यासाठी, ज्या बृहत नागरी क्षेत्राकरीता पुणे महानगरपालिकापालिका स्थापण करण्यात आली आहे, अशा बृहत नागरी क्षेत्राच्या सीमांत फेरफार करीत आहे. अनुसूची-

एकमध्ये विनिर्दिष्ट क्षेत्रांचा समावेश केल्यानंतर पुणे शहर महानगरपालिकेची सुधारीत हद्द अनुसूची-दोनमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल :-

## अनुसूची — एक

## पुणे शहरात समाविष्ट करावयाच्या क्षेत्रांचा तपशील

| अ.क्र. | महसुली गावाचे नाव | पुणे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या गावांचे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | लोहगांव (उर्वरित) | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| २ | मुंढवा (उर्वरित केशवनगर) | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| ३ | हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी) | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| ४ | शिवणे (संपूर्ण उत्तम नगर) | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| ५ | शिवणे | |
| ६ | आंबेगाव खुर्द | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| ७ | उंड्री | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| ८ | धायरी | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| ९ | आंबेगाव बुद्रुक | महापालिका क्षेत्रात यापूर्वीच समाविष्ट केलेल्या क्षेत्रासह उर्वरित गावाचे महसुली क्षेत्र. |
| १० | फुरसुंगी | संपूर्ण गावाचे महसुली क्षेत्र. |
| ११ | ऊरळी देवाची | संपूर्ण गावाचे महसुली क्षेत्र. |

## अनुसूची –दोन

### पुणे शहराची सुधारित हद्द

| | | |
|---|---|---|
| १ | उत्तरेस | कळस, धानोरी व लोहगांव या महसुली गावांची हद्द |
| २ | उत्तर-पूर्व | लोहगाव, खराडी या महसूली गावांची हद्द. |
| ३ | पूर्वेस | मुंढवा (केशवनगर), हडपसर (साडेसतरानळी), हडपसर, फुरसुंगी या महसूली गावांची हद्द. |
| ४ | दक्षिण-पूर्व | उरूळी देवाची, हडपसर, महमंदवाडी, उंड्री या महसुली गावांची हद्द. |
| ५ | दक्षिणेस | येवलेवाडी, कात्रज, या महसुली गावांची हद्द. |
| ६ | दक्षिण-पश्चिमेस | धायरी, वडगाव बुद्रुक, आंबेगाव बुद्रुक, आंबेगाव खुर्द या महसुली गावांची हद्द. |
| ७ | पश्चिमेस | शिवणे, बावधन खुर्द, वडगाव खुर्द या महसूली गावांची हद्द. |
| ८ | पश्चिम-उत्तर | बाणेर, बालेवाडी या महसुली गावांची हद्द व पुणे महानगरपालिकेची जुनी हद्द. |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(सं.श.गोखले)

शासनाचे उप सचिव